# जिल्हा परिषदरत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

माळनाका, रत्नागिरी -४१५६१२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## वित्त विभाग

दूरध्वनी क्र-:. ०२३५२ - २२२४ २७ई-मेल-:cafozpratnagiri@gmail.com

जा.क्र.रजिप/वित्त/फ-१/आस्था-१/पदोन्नती/१३७४/२०२३ दिनांक :- ०७/०६/२०२३

**वाचले**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवा प्रवश) नियम १९६७ मधील परिशिष्ट- अकरा (नियम-५) (३)
२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक —असंक-१००१/प्र.क्र.२९ (भाग-६)२००४/वित्तीय सुधारणा-
दिनांक १ जुलै, २००४
३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. मागास-७०४/प्र.क्र.११०/आस्था-७/दिनांक ७ जुलै, २००४
४. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मंबई शासन निर्णय क्र. बीसीसी २००१/१८७७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २६ ऑक्टोबर, २००४
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब दि.२४ ऑग. २००६
६. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई पत्र क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब दि.१३/०३/२००७
७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००४/प्रक्र-५७०/ मावक-५ दिनांक १६ मे, २००७
८. सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.५६६/का-१२, दिनांक ०८.जानेवारी, २०१६
९. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२ सप्टें.२०१६
१०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२, दि. १५ डिसें.२०१७
११. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६/१६ब,दि.२९.१२.२०१७
१२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.डिएसआर/२०१९ प्र.क्र.१६-आस्था ०५ दिनांक ०६ मार्च, २०१९
१३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ दिनांक २९ मे, २०१९
१४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२,दि.०१/०८/२०१९
१५. ग्राम विकास विभागाकडील जा.क्र.दिव्यांग -२०१९/प्र.क्र.७७८/आस्था-७ दि.२५ नोव्हें. २०१९ चे पत्र
१६. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ७ मे, २०२१
१७. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ ची अंतिम सेवाजेष्ठता
१८. पदोन्नती समिती सभा दिनांक ०१/०६/२०२३ चे इतिवृत्त.

**आदेश :**

खालील नमुद कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवा(वर्ग तीन) (लेखा) यातकनिष्ठ सहाय्यक (लेखा) (वर्ग-तीन) वेतनश्रेणी रुपये एस-६ (१९९००-६३२००) वरुन वरिष्ठ सहाय्यक (लेखा) (वर्ग-तीन) या पदावर वेतनश्रेणी रुपये एस-०८ (२५५००-८११००) मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद अटी व शर्तीस अधिन राहून पदोन्नती देऊन त्यांचे नावासमोर रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | सामाजिक प्रवर्ग | सध्याची पदस्थापना | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पदावरील पदोन्नतीने पदस्थापना दिलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. दिपक उमाजी जाधव कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | अनु. जाती | वित्त विभाग | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. रत्नागिरी |

**शर्ती व अटी:-**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचीका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचीका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचीका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरणयात येत आहे.
२. उक्त प्रमाणे संबंधितास महाराष्ट जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ तील ६मधील तरतुदीनुसार तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नतीदेण्यात येत आहे.सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असल्याने कोणतेही कारण न देता आवश्यक वाटल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल.
३. या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचा-यांना नियमित दोन्नतीचे म्हणजेच जेष्ठतेचे कोणतेही हक्कम प्राप्त होणार नाहीत.

४. सदरची पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१ व रिट पिटिशन (स्टॅम्प) १०८७८/२०२१ मधील आय.ए. (स्टॅम्प) १०९१०/२०२१ व १०९११/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

५. उक्त कर्मचारी यांनी हे आदेश निघाल्यापासून तीस दिवसांमध्ये वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पदावर रुजू होणे आवश्यक आहे.

६. उक्त पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चितीसाठी शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग पी.वाय-१०८२/सी.आर./११००(१)/एसईआर-३, दिनांक ६.११.१९८४ नुसार संबंधिताने एक महिन्याचे आत विकल्प देणे आवश्यक राहील.मुदतीत विकल्प न दिल्यास नियमानुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.

७. संबंधित कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी वरिष्ठ सहाय्यक (लेखा) परावरील तात्पुरती पदोन्नती नाकारल्यास उक्त संदर्भ क्र.९ व १४ मध्ये उल्लेख केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबधित कर्मचा-याचे नाव सन २०२२-२०२३ च्या निवड सूचीतून काढून टाकण्यात येईल आणि, पुढील दोन वर्षी (सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५) होणा-या निवडसूचीमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिस-या वर्षाच्या निवडसूचीत (सन २०२५-२०२६) त्याची वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पदासाठीची पात्रता तपासण्यात येईल. यापूर्वी सेवांतर्गत/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (१२/२४ वर्ष) किंवा सातव्या वेतन आयोगामध्ये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेल्या कर्मचाऱ्यांनी उपरोक्तपदोन्नतीस नकार दिल्यास त्यांना सध्याचे पदाचे मुळ वेतनश्रेणीत पदावनत करण्यात येवून त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ तील नियम क्र.१२ नुसार करण्यात येईल.

८. उक्त पदोन्नत कर्मचाऱ्यास यापुर्वी सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना (१२ वर्ष ), सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना (२४ वर्ष ) अथवा ७ वा वेतन आयोगांतर्गत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी प्रदान करण्यात आलेली असल्यास त्यांची सदर पदोन्नतीमुळे पुन:श्चवेतन निश्चिती होणार नाही.

९. उक्त पदोन्नत कर्मचाऱ्यास पदोन्नती नाकारावयाची असल्यास त्यांनी आदेश मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाचे आतनिम्न स्वाक्षरीकार यांचे समक्ष कार्यालयीन दिवशी स्वत: उपस्थित राहून लेखी निवेदन सादर करावे.

१०. उक्त पदोन्नत कर्मचाऱ्यांने त्यांचे पदस्थापनेत बदल करण्याबाबत कोणत्याही प्रकारच्या राजकीय/बाह्य दबाव आणल्यास /तसा प्रयत्न केल्यास अथवा पदोन्नतीच्या पदस्थापनेवर रुजु होण्यास टाळाटाळ केल्यास त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ तील नियम क्र.६(५)चा भंग केल्याचे गृहीत धरण्यात येईल व ते शिस्त व अपील नियमांतर्गत कार्यवाहीस पात्र राहतील.

११. संबंधितानी उपलेखापालाची परीक्षा महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट-११ (नियम-५) ३ मध्ये नमूद केले नुसार विहीत मुदतीत व संधित उत्तीर्ण न केल्यास त्यांना कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदावर प्रत्यावर्तीत केले जाण्यास पात्र होतील. वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पदावर कनिष्ठ लेखाधिकारी पदासाठीची उपलेखापाल परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न केल्यास कनिष्ठ लेखाधिकारी पदोन्नतीसाठीची सेवा जेष्ठता गमावतील.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०६०९१९२२२३ असा आहे.

सही/-
(किर्ती किरण पुजार, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी
२. कार्यकारी अभियंता (ग्रापापू) जिल्हा परिषद रत्नागिरी
३. श्री. दिपज उमाजी जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) वित्त विभाग, यांना कार्यालयामार्फत.

(किर्ती किरण पुजार, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी